# एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत भूमिहीन / मत्ता नसणाऱ्यांसाठी उपजीविका मार्गदर्शक सूचना

**१ प्रस्तावना -**

केंद्र शासनाच्या पाणलोट विकास कार्यक्रम २००८ च्या सामाईक सुचनांनुसार एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP ) राबविला जातो. या सामाईक सुचनांचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे भुमिहीन व मत्ताहीन व्यक्तींच्या उपजीविका निर्मितीवर प्रामुख्याने दिलेला भर होय. प्रकल्पाच्या एकुण खर्चाच्या ९ % रक्कम उपजीविका निर्मितीसाठी राखून ठेवली आहे.

पाणलोट क्षेत्रात विकसित झालेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा अधिकाधिक उपयोग करुन घेताना पाणलोट क्षेत्रात शाश्वत उपजीविका निर्माण करणे आणि आर्थिक उत्पन्न वाढविणे हे या घटकाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मालमत्ता निर्मितीसाठी केलेली गुंतवणूक, उत्पन्न व उत्पादकतेत झालेली वाढ, सामाईक साधनसंपत्ती वापरण्याची गरिबांना मिळालेली संधी आणि कुटुंबस्तरावर उपजीविका उपलब्ध करुन देण्यासाठीची तंत्रकौशल्ये, यांचा एकत्रित परिणाम म्हणुन गरिबांना खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक दृष्टीने उपजीविकेची साधने उपलब्ध होतील.

**२ उपजीविका निर्मितीमध्ये वाढ करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे-**

२.१ उपजीविका निर्मिती उपक्रमांमध्ये प्रामुख्याने नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारीत उपक्रमांवर भर देण्यात यावा आणि समानता (नि:पक्षपातीपणा), लिंगभेद समभाव आणि पारदर्शकता या तत्वांचा विचार व्हावा. यामध्ये खालील बाबींकडे विशेष लक्ष द्यावे.

अ) मालमत्ता निर्मिती आणि उत्पन्न व उत्पादकता यांमध्ये वाढ करुन गरिबांसाठी उपजीविकाच्या संधी उपलब्ध करुन देणे व वाढविणे.

ब) सीमांत समुदायांना (अजा/अज, भुमिहीन, मत्ताहीन व्यक्ति, स्त्रिया इत्यादी यांचेसह) लाभाच्या संधी वाढविणे.

क) पारदर्शकरित्या लाभधारकांची निवड करणे.

२.२ भूमिहीन / मत्ताहीन कुटुंबांसाठी उपजिविका निर्मिती सामाईक मार्गदर्शक सुचनांमध्ये खालील ध्येय असावे.

१. कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविणे.
२. श्रम विभागणी व सहभाग
३. माहिती, ज्ञानाची योग्य उपलब्धता
४. उचित तंत्रज्ञान व संसाधने

## ३. नियोजन व अंमलबजावणी

३.१ मार्गदर्शक सुचनांच्या अंमलबजावणीमध्ये सर्वात महत्वाचा पैलू म्हणजे सीमांत समुदायाच्या सक्षमीकरणाचे साधन म्हणुन 'सूक्ष्म स्तरावर उपजीविकेचे नियोजन करणे' हे होय. ज्यामुळे सध्या मोठया प्रमाणात अस्तित्वात असलेल्या उपजीविकेच्या उपक्रमांना व्यवस्थित समजून घेण्यास आणि चालना देण्यास मदत होईल.

### ३.२ उपजीविका नियोजन

१. पाणलोट कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा, उपजीविका घटकाच्या अंमलबजावणीसाठी देखील जबाबदार असेल.

२. ग्रामसभा स्तरावर सर्वसाधारण हितसंबंधीपर्यंत माहितीची देवाणघेवाण व संवेदन यासाठी जनजागृती मोहीम हाती घेण्यात यावी.

३. उपजीविका घटकाअंतर्गत आराखडा तयार करणे बंधनकारक असेल.

४. पाणलोट विकास कार्यक्रमाच्या पुर्वतयारीच्या टप्प्यात प्रकल्प कार्यांन्वयिन यंत्रणेने पाणलोट विकास पथक, पाणलोट समिती, स्वयंसहायता गट, उपभोक्ता गटाचे सभासद, अजा/अज. स्त्रिया, भूमिहीन / मत्ताहीन कुटुंबे यांचे मत विचारात घेऊन, चर्चा करुन आराखडा तयार करावयाचा आहे.

आराखडा तयार करण्याची जबाबदारी मुख्यत्वेकरुन पाणलोट पथकातील उपजीविका तज्ञ, समूह संघटकाची असेल. संबंधित प्रकायंचे क्षेत्रिय कर्मचारी त्यात सहभागी होतील.

५. एकत्रिकरणास (Convergence) उत्तेजन देण्यासाठी प्रकायंने इतर रोजगार निर्मिती कार्यक्रम उदा- म.गां.रो.ह.यो., राष्ट्रीय ग्रामिण उपजीविका कार्यक्रम (NRLM) या सारख्या रोजगारनिर्मीती करणाऱ्या कार्यक्रमाच्या संलग्न सहकार्यातुन काम करणे अपेक्षित आहे.

६. आराखडा तयार करण्याकरीता सहभागीय ग्रामिण समिक्षण (PRA), समूह चर्चा व गट चर्चा यावर भर द्यावा. या आराखड्यात परिसरातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा व अस्तित्वात असलेल्या उपजीविका साधनांचे विश्लेषण करावे. तसेच यामध्ये समाविष्ट करावयाचे उपक्रम, त्यांचा प्राधान्यक्रम, समाविष्ट करावयाच्या स्वयंसहायता गटांची संख्या, करावयाची उपाययोजना आणि अपेक्षित साथ या बाबींचा समावेश असावा.

७. आराखडयाची प्रत संबंधित स्वयंसहायता गटांना देखील उपलब्ध करुन देण्यात यावी.

८. आराखडा अंमलबजावणीच्या वेळी एखाद्या उपक्रमाच्या कार्यान्वयनात अडचण आल्यास, बदल आवश्यक झाल्यास संबंधित लाभार्थ्याच्या सहमतीने बदल करुन त्यास जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्रा ( WCDC) ची मान्यता घ्यावी.

### ३.३ कार्यपध्दती

१. हा आराखडा स्वयंसहायता गट किंवा त्यांच्या संघाच्या माध्यमातून राबवायचा आहे, तथापि एखाद्या उद्यमशील वैयक्तिक लाभार्थ्याचा (स्वयंसहायता गटाचा सभासद नसला तरी) विचार करता येईल. मात्र अशा लाभार्थ्यांसाठी उपजीविका घटकाकरीता असलेल्या तरतूदीच्या १०% पेक्षा जास्त निधी असणार नाही.

२. सध्या कार्यरत असलेला कार्यक्षम स्वयंसहायता गट किंवा नव्याने गठीत केलेल्या परिपक्व स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून हा कार्यक्रम घेण्यात यावा.

३. उपजीविका उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी निवडलेले स्वयंसहायता गट सामाईक हित, गरजा आणि अस्तितवात असलेली उपजिवीकेची साधने यादृष्टया एकसंध असावेत.

४. स्वयंसहायता गट कोणताही उपजीविका उपक्रम एकत्रितपणे हाती घेऊ शकतात किंवा स्वयंसहायता गटाच्या छत्राखाली असलेल्या वैयक्तिक उपक्रमांना अर्थसहाय्य पुरवू शकतात. स्वयंसहायता गटाअंर्तगत वैयक्तिक उपक्रमांच्याबाबतीत संबंधित व्यक्ती त्या स्वयंसहायता गटास उत्तरदायी असेल.

५. वैयक्तिकरित्या उपजीविका उपक्रम राबवू इच्छिणाऱ्या उद्यमशील व्यक्तीने उपजीविका प्रस्ताव तयार करावा. पाणलोट समितीच्या शिफारशीवर प्रकायंने सदर प्रस्तावाचा आराखड्यात समावेश करावा. जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्राने मंजूर केलेल्या प्रस्तावास अर्थसहाय्य प्राप्त होईल.

## ४. उपजीविका घटकाअंतर्गत निधी उपलब्ध होण्यासाठीची पात्रता

१. लाभधारक हे सीमांत समुदायातील असावे ज्यामध्ये अजा/अज, भूमिहीन/मत्ताहीन लोक, महिला, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे इत्यादींचा समावेश असावा. त्यातही महिला, महिला कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे, अजा/अज लाभधारक असणाऱ्या स्वयसहायता गटांना प्राधान्य दयावे.

२. उद्यमशील वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी खालील प्राधान्यक्रम राहील.
प्राधान्यक्रम (उतरत्या क्रमाने).
  १. अजा/अज दारिद्र्य रेषेखालील महिला लाभार्थी
  २. अजा/अज दारिद्र्य रेषेखालील पुरुष लाभार्थी
  ३. सर्वसाधारण दारिद्र्य रेषेखालील महिला लाभार्थी
  ४. सर्वसाधारण दारिद्र्य रेषेखालील पुरुष लाभार्थी
  ५. अजा/अज महिला लाभार्थी
  ६. अजा/अज पुरुष लाभार्थी
  ७. सर्वसाधारण महिला लाभार्थी
  ८. सर्वसाधारण पुरुष लाभार्थी

३. निवडलेल्या स्वयंसहायता गटामध्ये एका कुटुंबातील एकापेक्षा अधिक सदस्य असणार नाहीत याची खात्री करावी.

४. गटांचा प्राधान्यक्रम ठरवताना स्वयंसहायता गटाकरीता जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या प्रचलित निकषाचा व गुणांकनाचा (gradation) उपयोग करावा.

५. प्रतवारीच्या निकषात पात्र असणाऱ्या पण इतर योजनेतून आर्थिक सहाय्य न घेतलेल्या स्वयंसहायता गटांना प्राधान्य द्यावे.

६. पाणलोट समितीने उपलब्ध निधीनुसार व प्रतवारीतील गुणानुक्रमानुसार पात्र गटांची निधीकरीता शिफारस करावी.

## ५. निधीची तरतूद आणि वितरणाची प्रशासकीय कार्यपद्धती.

१) एकुण प्रकल्प निधीच्या ९ टक्के रक्कम उपजीविका घटकाअंतर्गत अजा/अज, भूमिहीन/मत्ताहीन लोक, महिला इत्यादींचा समावेश असलेल्या सीमांत समुदायाच्या फायदयाकरिता राखून ठेवली आहे.

२) सदर निधीची रक्कम ही उपजीविका उपक्रम निवडीनंतर व त्याची खातरजमा झाल्यानंतर पाणलोट समितीच्या मागणीनुसार समितीच्या खात्यावर जमा केली जाईल. सदर रक्कम अर्थ सहाय्य

देण्याकरीता वापरली जाईल. स्वयंसहायता गटांना त्यांच्या प्रतवारीनुसार व गुणानुक्रमानुसार तसेच वैयक्तिक लाभार्थी यांना फिरत्या निधीसाठी बीज भांडवल व स्वयंसहायता गट/ स्वयंसहायता संघास मोठा उपजीविका कार्यक्रम राबविण्यासाठी सहाय्यक अनुदान (Grant-in-aid) म्हणून देण्यात येईल.

३) उपजीविका निधीपैकी किमान ७० टक्के निधी स्वयंसहाय्यता गटाच्या फिरत्या निधीकरता वापरला जाईल, ज्यात वैयक्तिक लाभार्थीचाही समावेश राहील आणि कमाल ३० टक्के रक्कम स्वयंसहाय्यता गट/ संघाच्या सहाय्यक अनुदानासाठी वापरला जाईल.

उदा. एखाद्या प्रकल्पाचा उपजीविका घटकाचा (९ टक्के) मंजूर निधी १० लाख रुपये असेल तर त्यापैकी किमान ७ लाख रुपये निधी फिरत्या बीज भांडवलाकरता वापरण्यात येईल व स्वयंसहाय्यता गट/ संघाच्या सहाय्यक अनुदानासाठी कमाल निधी ३ लाख रुपये इतका असेल., फिरत्या बीज भांडवलापैकी उद्यमशील वैयक्तिक लाभार्थ्यांना बीज भांडवल म्हणून द्यावयाचा निधी १ लाख रुपयांपेक्षा जास्त असणार नाही.

**५.१ फिरत्या निधीसाठी बीज भांडवल**

**अ. स्वयंसहायता गटासाठी बीज भांडवल**

१) स्वयंसहाय्यता गट अर्थसहाय्यासाठी पाणलोट समितीकडे अर्ज करेल. सादर केलेल्या अर्जाच्या गुणवत्तेच्या आधारे पाणलोट समितीच्या सभेत बहुमताने ठराव मंजूर केला जाईल. पाणलोट समितीच्या सदर सभेत संबंधित स्वयंसहाय्यता गटाच्या प्रतिनिधीस हजर राहता येईल. समितीपुढे आलेल्या अशा अर्थसहाय्याच्या प्रकरणामध्ये निवड व प्राधान्य विचारात घेऊन गुणवत्तानुक्रम ठरवला जाईल. गुणवत्ताक्रमानुसार स्वयंसहाय्यता गटांना अर्थ सहाय्य केले जाईल.

२) पाणलोट समितीच्या ठरावानुसार स्वयंसहाय्यता गटाच्या प्रस्तावित उपक्रमास सुरवातीला गटाच्या बचतीच्या दुप्पट किंवा रु.२५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल इतका निधी बिना व्याजी फिरता निधी म्हणून दिला जाईल.

३) स्वयंसहाय्यता गटास बीज भांडवल म्हणून प्राप्त झालेला निधी मासिक हप्त्यात पाणलोट समितीस परत करावा लागेल. पाणलोट समितीच्या ठरावानुसार परत करण्यात आलेला निधी परत त्याच गटास किंवा दुसऱ्या गटास देता येईल. गटाची बचत, त्यांची क्षमता व कार्यक्रमाचे स्वरुप विचारात घेऊन पाणलोट समिती मासिक हप्त्यांची संख्या व रक्कम ह्याबाबत निर्णय घेईल. मात्र कमाल हप्त्यांची संख्या १८ इतकी राहील.

४) स्वयंसहाय्यता गटातील दोन सभासदांच्या संयुक्त नावे असणाऱ्या गटाच्या बँकेच्या खात्यात अर्थसहाय्याची रक्कम **रेखांकित धनादेशाद्वारे** अदा केली जाईल.

५) सदर रकमेचा विनियोग सामाईक कार्यक्रमाकरता आणि / किंवा गटातील सभासदास उत्पन्न वाढीच्या कामासाठी वैयक्तिक कर्जाच्या रुपात करता येईल. वैयक्तिक रुपात अर्थसहाय्य केले असल्यास तो सभासद गटास अर्थसहाय्य तसेच कामाच्या प्रगतीस उत्तरदायी असेल.

६) गटांतर्गत कर्जाचा दर १२ % दर साल दर शेकडापेक्षा जास्त असणार नाही.

७) अर्थसहाय्य प्राप्तीस पात्र स्वयंसहाय्यता गटाने पाणलोट समितीशी करारनामा करणे अनिवार्य राहील. सदर करारनाम्यात कर्तव्ये, जबाबदारी, अटी व शर्तीचा समावेश राहील.

**ब. उद्यमशील वैयक्तिक लाभार्थीस बीज भांडवल**

१) उद्यमशील व्यक्ती अर्थसहाय्य प्राप्त करण्यासाठी उपजीविका प्रस्तावासह पाणलोट समितीस अर्ज करेल. पाणलोट समिती प्राप्त झालेल्या प्रकरणांची गुणवत्ता तपासून त्यांच्या नियमित सभेत त्यावर निर्णय घेऊन तसा ठराव मान्य करेल. वैयक्तिक लाभार्थ्यांस द्यावयाच्या बीज भांडवलाच्या रकमेबाबत पाणलोट समितीकडून प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेकडे शिफारस केली जाईल. त्यानुसार सदर उपक्रमाचा आराखड्यामध्ये समावेश केला जाईल.

२) पाणलोट समितीच्या सभेस अर्जदार व्यक्तीस उपस्थित राहता येईल. प्रस्तावित उपक्रमांचे प्राधान्य व निवड विचारात घेऊन ठरावात गुणानुक्रम नमूद केला जाईल. जेणे करुन सर्व पात्र उद्यमशील व्यक्तींना त्यांच्या गुणानुक्रमानुसार सहाय्य देणे शक्य होईल.

३) पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्राने उपजीविका कृती आराखड्यास मान्यता दिल्यानंतर अशा उद्यमशील व्यक्तीस पाणलोट समिती अर्थसहाय्य वितरीत करेल. लाभार्थी व्यक्ती हे बीज भांडवल कमाल १८ मासिक हप्त्यात पाणलोट समितीस परत करेल. पाणलोट समितीच्या निर्णयानुसार अशी परत केलेली रक्कम गुणानुक्रमे पुढील उद्यमशील व्यक्तीस अर्थसहाय्यता रुपात परत देता येईल.

४) अशा प्रकारचे सहाय्याची कमाल मर्यादा प्रति लाभार्थी रु. १०,००० इतकी राहील.

५) लाभार्थीच्या नावे असणाऱ्या बँकेच्या खात्यात अर्थसहाय्याची रक्कम **रेखांकित धनादेशाद्वारे** अदा केली जाईल.

६) असे बीज भांडवल बिनव्याजी असणार नाही, मात्र व्याजाचा दर १२ % दर साल दर शेकडापेक्षा जास्त असणार नाही.

७) परत करण्यात आलेले मुद्दल गुणानुक्रमे पुढील उद्यमशील व्यक्तीस किंवा अशी व्यक्ती इच्छुक नसल्यास स्वयंसहायता गटास बीज भांडवल म्हणून द्यावी. व्याजाची रक्कम पाणलोट विकास निधीत जमा करावी.

**५.२ प्रमुख उपजीवीका उपक्रमांसाठी निधी वितरण**

१) धडाडीच्या व प्रतवारीनुसार सक्षम ठरलेल्या स्वयंसहाय्यता गटास/संघास (कमीत कमी ५ स्वयंसहायता गट) प्रमुख उपजीविका उपक्रम हाती घेण्याकरता किंवा चालू कामांची गुणवत्ता वाढण्यासाठी अर्थसहाय्य प्राप्त होऊ शकते. पाणलोट समितीच्या शिफारशीने संबंधित शासकीय विभाग आणि बँकेच्या सल्ला मसलतीने अशा उपक्रमाचा आराखड्यात समावेश केला जाईल. अशा उपक्रमाच्या प्रकारानुसार त्याकरता संयुक्त कर्ज (सहाय्यक अनुदान व बँक कर्ज) घेता येईल. कार्यक्रमाच्या मूल्याच्या ५० टक्के किंवा रु. २.०० लाख यापैकी जे कमी असेल ते सहाय्यक अनुदान मंजूर करता येईल. मात्र सहाय्यक अनुदान उपजीविका कार्यक्रमाच्या ३० टक्के पेक्षा जास्त असणार नाही. (एकूण प्रकल्प निधीच्या ९ टक्के)

## ६. लाभधारकांची क्षमता बांधणी

१) उपजीविका विश्लेषणानंतर तयार करण्यात आलेल्या उपजीविका कृती आराखडयामध्ये भूमिहीन/ मत्ताहीन लोक महिला यांचा समावेश असलेल्या सीमांत समुदायाच्या क्षमता बांधणीच्या गरजांचा समावेश असावा. क्षमता बांधणीचे उद्दिष्ट्य केवळ ज्ञान व माहिती वाढविणे हे नसून कौशल्य उंचावणे हे आहे.

क्षमता बांधणी या घटकाचे नियोजन पाणलोट विकास पथकातील उपजीविका तज्ञ व समूह संघटकाने पाणलोट समितीच्या सल्ल्याने करावयाचे असून, सदर प्रशिक्षण गरजांशी अनुरुप प्रशिक्षण यशदा संस्थेने निवडलेल्या संस्थेच्या माध्यमातून करण्यात येईल.

२) उपजिवीका घटकावरील प्रशिक्षणावरील खर्चाची तरतूद प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीसाठी राखीव, म्हणजेच एकूण प्रकल्प किंमतीच्या ५ राखीव निधीमधून करावयाची आहे.

३) स्वयंसहायता गटांनी व्यक्त केलेल्या कौशल्यावर आधारीत प्रशिक्षण गरजांशिवाय, खालील घटकांवर प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे.

अ. दस्तऐवजांची नोंद ठेवणे (कॅश बुक आणि लेजर रजिस्टर, अंदाजपत्रक तयार करणे, लेखा हिशेब ठेवणे इत्यादी)

ब. बैठकीचे इतिवृत्तांत व पाठपुरावा

क. प्रक्षेत्र भेटी, पशुधन, शेती / फलोत्पादन, वनशेती, मत्स्यशेती व पाणलोट संबंधीत इतर उत्पादक उपक्रम, सूक्ष्म उदयोजकता, सूक्ष्म पतपुरवठा या विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन

ड. बाजार आणि दर निश्चितीकरणाचे ज्ञान, मूल्यवर्धन, शेतकऱ्यांच्या उत्पादन कंपन्यांसह इतर पर्यायी संस्थांबाबत ज्ञान.

इ. इतर संबंधित पैलू / विषय

४) सदर क्षमता बांधणीचे काम यशदा ह्या प्रशिक्षण शिखर संस्थेच्या माध्यमातून निवडण्यात आलेल्या संस्थांमार्फत करण्यात येईल. प्रशिक्षणाच्या अनुषंगाने प्रशिक्षण मोड्यूल, वाचन साहित्य तयार करणे इत्यादिदी कामेही यशदा मार्फत करण्यात येतील.

७. Unique Identification Authority of India (UIDAI) आधार कार्ड तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली की, ‘आधार’च्या माध्यमातून लाभधारक ओळखला जााईल, जेणे करुन, गरजू लोकांपर्यंत कार्यक्षम व पारदर्शकरीत्या (पुनरावृत्ती टाळून) सुविधा वितरण होऊ शकेल.

## एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत उत्पादनपद्धती आणि सूक्ष्म उद्योगांवरती आधारीत उपजीविका उपक्रमाबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना.

१. प्रस्तावना-

१.१ एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पातळीवरील शेती आधारीत उत्पादनपद्धती आणि सूक्ष्म उद्योगांना चालना देऊन उदरनिर्वाहाची साधने बळकट करण्याच्या दृष्टीने व्यापक विचार झाला आहे. त्यानुसार भूधारकांच्या उत्पादनपद्धती व सूक्ष्म उद्योगांना सहाय्य करण्यासाठी प्रकल्पाच्या एकूण निधीपैकी १० टक्के इतकी तरतूद करण्यात आली आहे. वैविध्यपूर्ण शेती पध्दती आणि उत्पादन व उत्पादकतेत वाढ होऊन त्याचा फायदा जमीनधारकांना व मत्ता नसणाऱ्या शेतमजुरांना व बटईने शेती करणाऱ्यांना व्हावा असे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

१.२ या कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे –

अ) वैविध्यपूर्ण शेतीपद्धती/उत्पादन पद्धतीवर आधारीत उपजीविका उपक्रमांना प्रोत्साहन देणे

ब) उपजीविका संवर्धनासाठी एकात्मिक शेतीपद्धती, सुधारीत व सिध्द तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे

२. **नियोजन आणि आणि अंमलबजावणी –**

२.१ प्रस्तुत उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रकल्प अहवाल तयार करतानाच उत्पादन पद्धती व सूक्ष्म उद्योजकतेसाठी सूक्ष्मनियोजनाची तरतुद करणे गरजेचे आहे.

अ. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत उत्पादन पद्धती व सूक्ष्म उद्योगावर आधारीत उपजीविका उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

ब. मंजुर प्रकल्पातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती तसेच विद्यमान उपजिविका उपक्रमांची उपलब्ध नैसर्गीक साधनसामग्रीशी सांगड घालुनच नव्याने घ्यावयाच्या उत्पादन पध्दती व सूक्ष्म उद्योगावर आधारीत उपजीविका उपक्रमांची निवड करावी. यासाठी ग्रामपातळीवर ग्रामिण सहभागीता समीक्षण (PRA) पद्धतीचा अवलंब करावा.

क. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने उत्पादन पद्धती व सूक्ष्म उद्योगावर आधारीत उपजिविका उपक्रमाचा कृती आराखडा तयार करावा यामध्ये मत्स्योत्पादन, फलोत्पादन, कृषि उत्पादन, कृषि-वानिकी, पशु संवर्धन, लघुउद्योग, कृषि प्रक्रिया, मुल्यवर्धन व पणन यासारख्या उपक्रमांचा समावेश करावा. सदर आराखडा हा उपजीविका कृती आराखड्याचा भाग असेल.

ड. अन्य योजनांतील उत्पादन पद्धती व लघुउद्योगावर आधारीत उपजीविका उपक्रमाची सांगड घालण्याचे दृष्टीने प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने MGNREGS, NRLM, NHM, RKVY, NFSM, Micro-irrigation यासारख्या योजनांची मदत घ्यावी. ही बाब सविस्तर प्रकल्प अहवालामधील एकत्रीकरण (Convergence) नियोजनात स्पष्टपणे प्रतिबिंबित होणे अपेक्षित आहे.

इ. उत्पादनपद्धती आणि सूक्ष्मउद्योजकतेशी निगडीत आराखडा हा स्थानदर्शक / शेतकरी हा केंद्रबिंदू मानून नियोजनबद्ध असावा. तसेच या सर्व गोष्टींचा उल्लेख असणारा नकाशा सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये समाविष्ट करावा

फ. आराखडा अंमलबजावणीच्या वेळी एखाद्या उपक्रमाच्या कार्यान्वयनात अडचण आल्यास, बदल आवश्यक झाल्यास संबंधित लाभार्थ्याच्या सहमतीने बदल करुन त्यास जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्रा ( WCDC) ची मान्यता घ्यावी.

**३. सूक्ष्म उद्योजकता / उत्पादन पद्धतीसाठी निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी कार्यपद्धती व पात्रतेचे निकष.**

३.१ वैयक्तिक भूमिधारक सूक्ष्म उद्योजकता व उत्पादन पद्धतीचे फायदे घेण्यास पात्र असेल. लाभार्थीची निवड खालील प्राधान्यक्रमानुसार करण्यात यावी

प्राधान्यक्रम (उतरत्या क्रमाने).

९. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी

१०. अजा/अज अत्यल्प भूधारक

११. अजा/अज अल्प भूधारक

१२. अल्प भूधारक शेतकरी (१ ते २ हेक्टर पर्यंतचे भूधारक)

१३. सर्वसाधारण इतर शेतकरी

वरील सर्व प्रवर्गात महिला लाभार्थ्यांना प्राधान्य द्यावे.

३.२ प्रकल्पांतर्गत विकसीत केलेल्या नैसर्गिक संसाधनाचा पुरेपूर उपयोग करण्याच्या दृष्टीने अशा संसाधनाचा जवळपास क्षेत्र असणाऱ्या कुटुंबास, पाणलोटातील माथ्याकडील बाजुचे शेतकरी त्या त्या प्रवर्गात यांना प्राधान्य दिले जाईल.

३.३ प्रकल्प कार्यन्वयन यंत्रणा पाणलोट समितीशी सल्लामसलत करुन उपरोक्त निकष विचारात घेऊन लाभार्थ्यांची निवड करावी.

३.४ समान गरजा असलेल्या लाभार्थींचे उपभोक्ता गटांमध्ये संघटन करावे. त्यामुळे लाभार्थींकडील साधन संपत्तीचा एकत्रित वापर करणे,उत्पादनाचे संकलन व एकत्रित विक्री करणे, तसेच नैसर्गीक साधन संपत्तीचे परीरक्षण करणे सुलभ होईल.त्याचबरोबर साधन संपत्तीचा समान व शाश्वत वापर करण्यासाठी एक माध्यम उपलब्ध होईल.

३.५ या घटकांतर्गत मत्स्योत्पादन, फलोत्पादन, कृषि उत्पादन, कृषि-वानिकी, पशु संवर्धन, कृषि प्रक्रिया, मूल्यवर्धन व पणन यासारख्या सघन शेती पध्दतीवर (intensive farming system) आधारीत उपजीविका उपक्रमासाठी निधी देण्यात यावा.

३.६ सदर उपक्रमास प्रकल्पाच्या दर हेक्टरी मापदंडाच्या (रु.१२,०००/१५,००० यापैकी जे देय असेल) दुप्पट इतक्या मर्यादेपर्यंत निधी देय राहील. त्यापेक्षा जास्त निधी आवश्यक असल्यास लाभार्थ्यांस त्याचा भार सोसावा लागेल. तसेच सदर अनुदानाप्रीत्यर्थ सर्वसाधारण लाभार्थ्यास प्राप्त निधीच्या २० टक्के तर अजा/अज लाभार्थ्यांस १० टक्के इतकी रक्कम पाणलोट विकास निधीत वर्गणीदाखल जमा करावा.

३.७ शेतक-याची वर्गणी सर्वसाधारण लाभार्थी २० टक्के व अजा / अज लाभार्थी १० टक्के (कमाल रु.४८००/ ६००० आणि रु २४००/३००० अनुक्रमे सर्वसाधारण व अजा / अज लाभार्थीसाठी) पाणलोट विकास निधीत जमा करावा.

३.८ कामाची अंमलबजावणी सुरु करण्यापुर्वी उपक्रमासाठी आवश्यक लाभार्थ्याचा हिस्सा पाणलोट समितीच्या प्रकल्प निधी खात्यात व शेतकऱ्यांच्या वर्गणीचा हिस्सा पाणलोट विकास निधीत जमा करावा.

उदा-

१) **समजा एखाद्या उत्पादन पध्दती किंवा सूक्ष्म उद्योगाचे प्रकल्प मूल्य रु. ३०,०००/- असेल तर**

**अ) एपाव्यका कार्यकमामधुन मिळणारा निधी (@ रु. १२,००० /-प्रति हेक्टर प्रकल्प एकक मूल्य)**

| | |
|---|---|
| **(खुला/सर्व साधारण प्रवर्ग)** | **रु. २४,०००** |
| **(अनुसूचित जाती /जमाती)** | **रु. २४,०००** |
| **ब) पाणलोट विकास निधीकरीता शेतकऱ्यांचा वाटा** | |
| **(खुला/सर्व साधारण प्रवर्ग, रु. २४,००० च्या २० %)** | **रु. ४,८००** |
| **(अनुसूचित जाती /जमाती, रु. २४,००० च्या १० %)** | **रु. २,४००** |

२) **समजा एखाद्या उत्पादन पध्दती किंवा सूक्ष्म उद्योगाचे प्रकल्प मूल्य रु. २०,०००/- असेल तर**

**अ) एपाव्यका कार्यकमामधुन मिळणारा निधी (@ रु. १२,००० /-प्रति हेक्टर प्रकल्प एकक मूल्य)**

| | |
|---|---|
| **(खुला/सर्व साधारण प्रवर्ग)** | **रु. २०,०००** |
| **(अनुसूचित जाती /जमाती)** | **रु. २०,०००** |
| **ब) पाणलोट विकास निधीकरीता शेतकऱ्यांचा वाटा** | |
| **(खुला/सर्व साधारण प्रवर्ग, रु. २०,००० च्या २० %)** | **रु. ४,०००** |
| **(अनुसूचित जाती /जमाती, रु. २०,००० च्या १० %)** | **रु. २,०००** |

४. **उत्पादन पध्दती / सूक्ष्म उद्योजकता अंतर्गत समाविष्ट करावयाच्या बाबी**

१) कृषि-वानिकी, फलोत्पादन यासारखे लागवडीचे उपक्रम शक्यतोवर एकत्रिकरणाच्या माध्यमातून म्हणजेच अनुक्रमे सामाजिक वनीकरण (SFD), रोहयोशी निगडीत फलोत्पादन, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान (NHM)ह्या कार्यक्रमांतर्गत घ्यावेत.

२) विविध पीक तंत्रज्ञान प्रात्यक्षिके कृषि विभागाच्या प्रचलित योजनांशी सांगड घालून एकत्रिकरणात (Convergence) घ्यावीत.

३) सूक्ष्म उद्योजकते अंतर्गत शेतीशी निगडीत असे पूरक व्यवसाय (जसे की पशुपालन, कुक्कुट पालन, शेळी-मेंढी पालन, ससे पालन, मधमाशीपालन, रेशीम उद्योग, गांडुळ खत उत्पादन इत्यादी) घ्यावेत.

४) पशुपालन, कुक्कुट पालन, शेळी-मेंढी पालन, ससे पालन इत्यादी योजनांसाठी महाराष्ट्र शासनाच्या पशु संवर्धन विभागाचे भौतिक/आर्थिक मापदंड, खरेदी प्रक्रिया, विमा तरतूद, लसीकरणासारख्या पशु वैद्यकीय उपाययोजना इत्यादीचे निकष लागू रहातील. सुलभ संदर्भासाठी काही चालू असलेल्या योजनांचे शासन निर्णय, माहिती, नाबार्डच्या मार्गदर्शक सूचना परिशिष्ट १ मध्ये देण्यात येत आहेत.

सदर योजनांकरीता असणारे आर्थिक मापदंड विचारात घेतांना एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातील देय अनुदानाच्या मर्यादेतच अनुदान देय राहील.(रु.२४०००/३०००० जे देय असेल)

५) उत्पादन पध्दती अंतर्गत मुख्यत्वेकरुन कृषि विभागाकडील मका विकास कार्यक्रम, गळीत धान्य विकास कार्यक्रम, ऊस विकास योजना या सारख्या पीक योजनांतर्गत खालील उपक्रम घ्यावेत.

४.१) कोनोविडर

४.२) भात लावणी यंत्र

४.३) डिझेल / इलेक्ट्रीक पंपसेट

४.४) फवारणी यंत्र (स्प्रेअर)

४.५) एचडीपीई / पीव्हीसी पाईप पुरवठा

४.६) सीड ड्रिल

४.७) रोटरी टिलर /रोटावेटर/कल्टीवेटर

४.८) सुधारीत कृषि औजारांचा पुरवठा ( स्वयंचालित / पॉवर ऑपरेटेड औजारे)

४.९) ब्रश कटर

४.१०) थ्रेशर

पीक योजनांमधील उपरोक्त बाबी वगळता इतर बाबी संबंधित योजनेच्या एकत्रीकरणातून (Convergence) करण्यात याव्यात.

६) उत्पादन पध्दतीकरीता अर्थ सहाय्याची कमाल मर्यादा रु. २४,००० / ३०,००० असली तरी कृषि विभागाच्या प्रचलित योजना व एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातील अनुदानात एकसमानता रहावी ह्या दृष्टीने सदर बाबींकरीता संबंधित योजनेमधील प्रचलित बाबनिहाय आर्थिक मर्यादा व मापदंड एपाव्यका करीता लागू रहातील. म्हणजेच किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. २४,००० किंवा ३०,००० यापैकी जे कमी असेल ते देय राहील

मात्र एपाव्यका अंतर्गत लाभार्थ्यास मिळणाऱ्या अनुदानाच्या प्रमाणात त्याच्या वर्गणीचा वाटा पाणलोट विकास निधीत जमा करणे अनिवार्य राहील.

उदा- एखाद्या उपक्रमाची किंमत २०,००० रुपये असेल तर लाभार्थ्यास रु. १०,००० चा लाभ एपाव्यका अंतर्गत मिळेल, उर्वरीत रक्कम त्याची स्वत:ची असेल. अनुदानाच्या लाभापोटी त्याला रु. २,००० **(खुला/सर्व साधारण प्रवर्ग)** किंवा १,००० **(अनुसूचित जाती /जमाती)** त्याच्या वर्गणीचा वाटा म्हणून पाणलोट विकास निधीत जमा करावा लागेल.

७) उपरोक्त औजारे, साहित्य इत्यादी खरेदी पाणलोट समितीच्या माध्यमातून करतांना कृषि विभागाच्या(गुणनियंत्रण) अटी व शर्तीचे अधीन राहून करावी.

८) उपरोक्त योजनांतील प्रशिक्षण, मॉडेल फार्म/संशोधन संस्थांना भेटी (शेतकऱ्यांच्या अभ्यास सहली) इत्यादी बाबी ह्या उपक्रमाखाली प्रस्तावित करु नयेत, आवश्यकतेनुसार त्यांचा क्षमता बांधणी अंतर्गत करण्यात यावा.

९) राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत खालील उपक्रम प्रस्तावित करता येतील, त्याकरता अनुदान किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. २४,००० किंवा ३०,००० यापैकी जे कमी असेल ते देय राहील.

१) शेड नेट हाऊस, प्लॅस्टिक टनेल

२) शेड नेट हाऊसमधील भाजीपाला लागवड, फुलांची लागवड

३) गांडुळ कल्चर तथा खत उत्पादन केंद्राची स्थापना

४)मधुमक्षिका वसाहत व मधुमक्षिका संच वाटप

५) मध काढणी व साठवणूक यंत्रसामुग्री

१०) राष्ट्रीय सूक्ष्मसिंचन अभियान कार्यक्रमांतर्गत बाबीकरीता रु. २४,००० किंवा ३०,००० च्या मर्यादेत अर्थसहाय्य देता येईल.

११) काढणी पश्चात आणि ग्राम स्तरावरील छोटी साठवणूक (उदा- कांदा चाळ), पॅकेजिंग, कृषि प्रक्रिया युनिट

## ५. निधीची तरतूद, वितरणाची प्रशासकीय कार्यपद्धती.

१) एकुण प्रकल्प निधीच्या १० टक्के रक्कम उत्पादन पध्दती / सूक्ष्म उद्योजकता यावर आधारीत उपजीविका उपक्रमांकरीता वापरला यावा . त्यापैकी उत्पादन पध्दती तसेच सूक्ष्म उद्योजकता यासाठी सर्वसाधारणपणे जवळपास प्रत्येकी ५ टक्के रक्कम वापरली जावी.

२) सदर निधीची रक्कम ही उत्पादन पध्दती / सूक्ष्म उद्योजकता उपक्रम निवडीनंतर व त्याची खातरजमा झाल्यानंतर पाणलोट समितीच्या मागणीनुसार त्यांच्या खात्यावर अनुदान म्हणुन जमा करावी. सदर रक्कम निवडलेल्या शेतकऱ्यास अर्थ सहाय्य देण्याकरीता वापरण्यात यावी.

३) लाभार्थीने पाणलोट समितीच्या नावे विहीत नमुन्यात अर्ज करावा.

४) पाणलोट समितीने शिफारसीसह सदर अर्ज प्रकायंकडे पाठवावेत.

५) वर ३.१ मध्ये नमूद केलेल निकष विचारात घेऊन प्रकायंने अर्जातील उपक्रमांचा आराखड्यात समावेश करावा.

६) प्रत्येक लाभार्थीला प्रकल्प कालावधीत जास्तीत जास्त रु. २४,००० किंवा ३०,००० जे देय असेल तेवढ्या मर्यादेतच लाभ द्यावा.

७) कृती आराखड्यातील मंजूर कार्यक्रमातील लाभार्थ्यास त्याचा हिस्सा भरण्याबाबत पाणलोट समितीने कालमर्यादा निश्चित करुन त्यानुसार लाभार्थ्यास लेखी कळवावे. जर विहीत कालमर्यादेत हिस्सा जमा न झाल्यास पुढील लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल असे स्पष्टपणे सूचित करावे व त्यानुसार पुढील लाभार्थ्यास लाभ देण्याबाबत कार्यवाही करावी.

८) उपक्रमासाठी आवश्यक लाभार्थ्याचा हिस्सा पाणलोट समितीच्या प्रकल्प निधी खात्यात व वर्गणीचा हिस्सा पाणलोट विकास निधी खात्यात जमा करुन घ्यावा.

९) वरीलप्रमाणे ज्या उपक्रमांत लाभार्थ्याचे दोन्ही हिस्से जमा झाले असतील अशा उपक्रमांसाठी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत देय अनुदानाची मागणी पाणलोट समितीने प्रकायंकडे करावी. तसेच आवश्यक ते पुरवठा आदेश संबंधित पुरवठादारास द्यावेत. खरेदीबाबत पुरवठादाराची निवड व गुणनियंत्रणासाठी संबंधित शासकीय विभागांच्या प्रचलीत पद्धतीचा अवलंब करावा.

१०) पाणलोट समितीकडून प्रकायंकडे मागणी आल्यावर प्राप्त मागणीची खातरजमा करुन जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्राकडे (WCDC) अनुदान वितरीत करण्याबाबत शिफारस करावी.

११) जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्राकडे मागणी आल्यापासून १५ दिवसाच्या आत देय अनुदान पाणलोट समितीच्या खात्यात जमा करावे.

१२) आदेशानुसार साहित्य प्राप्त झाल्यावर पाणलोट समितीने संबंधीत पुरवठादारास देयकाची रक्कम रेखांकीत धनादेशाद्वारे अदा करावी.

१३) सदर साहित्याची विहीत नोंदवहीत नोंद करून लाभार्थ्यास साहित्य सुपूर्द करावे.

## ६ क्षमता बांधणी

१) सहभागीय ग्रामिण समिक्षण व पायाभूत सर्वेक्षण करतेवेळी तयार करण्यात आलेल्या आराखडयामध्ये भूधारक/ भूस्वामींच्या क्षमता बांधणीच्या गरजांचा समावेश असावा. क्षमता बांधणीचे उद्दिष्ट्य केवळ ज्ञान व माहिती वाढविणे हे नसून कौशल्य उंचावणे हे आहे.

क्षमता बांधणीच्या या घटकाचे नियोजन पाणलोट विकास पथकातील कृषि / वन तज्ञाने पाणलोट समितीच्या सल्ल्याने करावयाचे असून, वार्षिक तत्त्वावर आवश्यक अंदाजपत्रकीय तरतूद करावी.

२) अशा प्रशिक्षणावरील खर्चाची तरतूद प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीसाठी राखीव, म्हणजेच एकूण प्रकल्प किंमतीच्या ५ टक्के राखीव निधीमधून करावयाची आहे.

३) यशस्वी शेती पध्दती / प्रात्यक्षिकांना प्रक्षेत्र भेटी, अभ्यास दौरा यांचा क्षमता बांधणीमध्ये समावेश करावा.

४) सदर क्षमता बांधणीचे काम यशदा ह्या प्रशिक्षण शिखर संस्थेच्या माध्यमातून करण्यात येईल.

## उपजीविका कृती आराखडा (Livelihood Action Plan) तयार करणे व मंजूरीची कार्यपद्धती

भूमिहीन / मत्ता नसणाऱ्यांसाठी उपजीविका उपक्रम आराखडा आणि उत्पादन पध्दती व सूक्ष्म उद्योगांवरती आधारीत उपजीविका उपक्रमांच्या आराखड्याचा समावेश करुन उपजीविका कृती आराखडा (Livelihood Action Plan) तयार करावा. हा आराखडा सविस्तर प्रकल्प अहवालाचे अविभाज्य अंग असावा. प्रकल्पाचा दुसरा हप्ता मिळण्याआधी उपजीविका कृती आराखडा (उकृआ ) तयार करावा.

त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**१) पाणलोट पथक सदस्य व क्षेत्रिय कर्मचारी क्षमता बांधणी**

**अ) पहिला टप्पा**

सद्यस्थितीत पाणलोट पथकातील तिन्ही सदस्य कृषी तज्ञ, उपजीविका तज्ञ व समूह संघटक यांना उपजीविका कार्यक्रमाचे १० दिवसाचे व सामाजिक अभिसरण या विषयांचे १० दिवसाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. सदरचे प्रशिक्षण कृषी सहाय्यक/कृषी पर्यवेक्षक यांच्याकरीताही आयोजित करण्यात आले आहे. उपजीविका प्रशिक्षणासाठी पाच राज्यस्तरीय संसाधन संस्थाची (वॉटर- अमरावती विभाग, दिलासा- औरंगाबाद, लातूर व नागपूर विभाग, प्रायमोव्ह- ठाणे विभाग, ॲफ्रो- पुणे व कोल्हापूर विभाग, एचटीसी- नाशिक विभाग)निवड करण्यात आली आहे. सामाजिक अभिसरण प्रशिक्षणासाठी पाच राज्यस्तरीय संसाधन संस्थाची (धरामित्र- अमरावती व नागपूर विभाग, ॲफ्रो- औरंगाबाद व लातूर विभाग, रुरल कमिन्स- ठाणे व नाशिक विभाग प्रायमोव्ह-, पुणे व कोल्हापूर विभाग,)निवड करण्यात आली आहे.

सदर प्रशिक्षणात खालील मुद्यांवर भर दिला जात आहे.

- ✓ उपजीविका - संकल्पना, महत्व
- ✓ रोजगार / स्वयंरोजगार / उद्योजकता - संकल्पना
- ✓ उपजीविका संधी शोध व छाननी
- ✓ अभ्यास सहल- उपजीविका संधी शोधासाठी सहभागी ग्रामिण समिक्षा (PRA)
- ✓ उद्योग / उपजीविका नियोजन- नियोजन, आर्थिक / बाजारपेठ व्यवहार्यता,
- ✓ उपजीविका प्रकल्प आराखडा बनवण्याची कार्यपध्दती
- ✓ नमुना प्रकल्प आराखडे बनवणे
- ✓ बाजारपेठ- विपणन- व्यवस्थापन
- ✓ कृषि विस्तार कार्यक्रम
- ✓ कृति आराखडा बनवणे

ब) दुसरा टप्पा

**१) उपजीविका कृती आराखडा कार्यशाळा**

- ह्या प्रशिक्षणानंतर पाणलोट पथक सदस्य त्यांच्या प्रकल्प क्षेत्रात जाऊन पाणलोट समितीच्या माध्यमातून उपजीविका कार्यक्रम निवडीचं काम सुरु करतील.
- साधारणतः चार महिन्याने ह्या पाणलोट पथक सदस्यांची ३ दिवसीय कार्यशाळा वरील प्रशिक्षण संस्था आयोजित करतील.
- सदर कार्यशाळेस प्रकायं, प्रकल्पांतील क्षेत्रिय कर्मचारी (कृषी सहाय्यक/कृषी पर्यवेक्षक, सामाजिक व वन विभागांचे संबधित कर्मचारी) व जिल्ह्याचे तांत्रिक तज्ञ यांनीही उपस्थित रहावे.
- पाणलोट पथक सदस्य निवडलेल्या सर्व उपजीविका उपक्रमांचे सादरीकरण करतील.
- सादर केलेल्या उपजीविका उपक्रमाची प्रशिक्षण संस्थातील तज्ञ तपासणी करतील.
- चर्चेअंती उपजीविका उपक्रमाचे मूल्यमापन करुन मसुदा आराखडा तयार केला जाईल. सदर आराखड्यात भूमिहीन / मत्ता नसणाऱ्यांसाठी उपजीविका तसेच उत्पादन पध्दती व सूक्ष्म उद्योजकता ह्या दोन्ही घटकांचा समावेश करावा.
- प्रकायं स्तरावर सदर मसुदा आराखड्यास अंतिम स्वरुप देऊन उपजीविका कृती आराखड्यात तयार करण्यात येईल.
- प्रकायंने सदर आराखडा सविस्तर प्रकल्प अहवालास छाननी करणाऱ्या जिल्हा स्तरीय समितीपुढे सादर करावा. सदर समितीत आवश्यकतेनुसार उपजीविका उपक्रमाशी संबंधित शासकीय विभागाच्या जिल्हा प्रमुखास आमंत्रित करण्यात यावे.
- समितीने मान्य केलेल्या उपजीविका कृती आराखड्यास प्रकल्प व्यवस्थापकांनी जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्राची मान्यता घ्यावी.
- मंजूर उपजीविका कृती आराखडयाची एक प्रत संबंधीत ग्रामपंचायतीला पुरविण्यात यावी.

२) **कौशल्याधारीत प्रशिक्षण**

उपजीविका कृती आराखड्यात निश्चित झालेल्या काही उपजीविका कार्यक्रमास कौशल्याधारीत प्रशिक्षणाची आवशकता राहील. हे प्रशिक्षण यशदाच्या माध्यमातून निवडलेल्या प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून घेण्यात येईल.

३) **स्वयंसहायता गटाची क्षमता बांधणी**

यशदाच्या माध्यमातून स्वयंसहायता गटाची खालील विषयांवर क्षमता बांधणी केली जाईल.

- दस्तऐवजांची नोंद ठेवणे (कॅश बुक आणि लेजर रजिस्टर, अंदाजपत्रक तयार करणे, लेखा हिशेब ठेवणे इत्यादी)
- बैठकीचे इतिवृत्तांत व पाठपुरावा

- प्रक्षेत्र भेटी, पशुधन, शेती / फलोत्पादन, वनशेती, मत्स्यशेती व पाणलोट संबंधीत इतर उत्पादक उपक्रम, सूक्ष्म उदयोजकता, सूक्ष्म पतपुरवठा या विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन
- बाजार आणि दर निश्चितीकरणाचे ज्ञान, मूल्यवर्धन, शेतकऱ्यांच्या उत्पादन कंपन्यांसह इतर पर्यायी संस्थांबाबत ज्ञान.
- इतर संबंधित पैलू / विषय खालील प्राधान्य क्रमानुसार करण्यात यावी.